Self-Recognition Certificate Form-2

https://new.emanytapun.org/certicate/3143

**Pune Zilla Parishad, Pune**
**Yashwantrao Chavan Bhavan, Wellesley Road, Camp, Pune 411001.**
**Education Department (Primary)**

---

**Email—edupri.zppune@gmail.com / ssapune1@yahoo.co.in**
**(Self-Recognition Form No. 2)** **//SCAN CODE//**

**Office Record Book Serial No. 59**

Dated: 31/07/2025
07/08/2025

E-Approval Application No. 2025816523133

To:

**The Chairman/Secretary/Headmaster**
**Eminence International School, Bakori, Tal. Haveli Dist., Pune, managed by The Eminence Education Society.**

**Sub Reg. Granting of certificates to the schools for the purpose under Section 18 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, Rule 11, Sub Rule (4) of the Maharashtra Right of Children to Free & Compulsory Education Rules 2011.**

**Ref. Online RTE Critical Inspection Report dated 21/11/2022 of Asma Begam Momin, Inspection Officer.**

With reference to your application dated 11/06/2025 and on the basis of correspondence made with the school and inspection of the school carried out, I, the Education Officer (Primary) of Pune Zilla Parishad Pune, am giving the provisional approval for Class 1st to Class 8th to the Eminence International School, managed by the Eminence Education Society, Bakori, Wagholi Tal. Haveli District Pune, for a period of three years from the 1st of April 2025 to the 31st of March 2028, and the UDISE No. is 27250511901 (Self-Financing School, English Medium).

The above-said approval is subject to compliance with the following conditions:

1. The term of approval shall not be exteextended, there shall be no binding term for approval or affiliation after the eighth class under any circumstances.
2. The school shall comply with the provisions of The Right of Children to Free and Compulsory Education (RTE) Act, 2009 (Annexure 1) and The Maharashtra Right of Children to Free & Compulsory Education Rules 2011 (Annexure 2).
3. The school shall allow free entrance to the nearby weak children and deprived section of the society in the first standard to the extent of 25% of the total number of students in that class admitted and shall offer free and compulsory education till completion of their education, and also in the case of pre-primary classes, the necessary percentage shall be complied with.
4. In terms of Section 12(2) of the Act, for the children mentioned in Para 3, to obtain reimbursement of the fees, the school should maintain a separate bank account.

Nandkumar Shantaram Vaidya, Translator hereby certifies that the above written text is an accurate translation in English of the original document in Marathi, I am competent in both Marathi and ENGLISH languages to render such translations.

NSVaidya

Translator N. S. Vaidya Pune

Translator

5. The school/society shall not recover any capitation fee and shall not make any scrutiny of the child or its mother or father or parents.
6. No child shall be denied admission to the school on account of lack of evidence of age, religion, caste, or creed, the birthplace of a child, or any of these reasons.
7. (1) The child admitted to the school shall not be kept stranded in any of the classes and shall not be dismissed from the school till completion of preparatory education. (2) No child shall be made to undergo any physical punishment or mental harassment. (3) No child shall be required to pass any board examination till completion of preparatory education. (4) The child shall be awarded with a certificate upon completion of preparatory education as stipulated in Rule 23. (5) In terms of the provisions of the Act, the handicapped/special needs child shall be accommodated. (6) In terms of section 23(1) of the Act, the appointment of a teacher with minimum qualification shall be made. However, it is added that a teacher not holding minimum qualification on the date of initiation of the Act shall have to acquire minimum qualification within 5 years. (7) The teachers shall have to carry out their responsibilities in terms of Section 24(1) of the Act. and (8) The teacher shall not engage himself in private tuition, which shall be confirmed by the school.
8. The school shall adopt a curriculum on the basis of studies prescribed and directed by the authority.
9. The school shall grant admission to the students in terms of the facilities provided by it in terms of Section 19 of the School Act.
10. The school shall follow the specified standards and authenticators in terms of Section 19 of the School Act. During the last inspection of the school, the following facilities were found available in the school:

    - The area of the campus of the school : 3809.025 SQ MT
    - The total area of construction : 2229.673 SQ MT
    - The Area of playground : 1393.546 SQ MT
    - No. of Classrooms : 14 classrooms
    - Office, Store, Headmaster's Room : 3 classroom

    - Separate washrooms for boys and girls and clean washrooms:

| | Boys | Girls |
|---|---|---|
| Toilets | **9** | **9** |
| Latrines | **14** | **9** |

    - Availability of drinking water - **Yes available**
    - Kitchen for lunch to be cooked—No.
    - Availability of study material, sports, and sports accessories & Library - **Yes**
    - Is reading material easily available? **—Yes, available. (No. of books: 325; Periodicals/newspapers: Times of India, Sakal)**

11. No classes or divisions that do not have approval shall be allowed to be conducted on the school premises or anywhere else.
12. The school building, other construction, and the ground shall be used for the educational and skill development purpose.
13. The school is managed by the Society registered under the Registration of Society Act 1860 (21 of 1860) or the Public Trust duly registered under the Bombay Public Trust Act 1950.
14. The school is not being managed for the profit derived by a person, or group, or group of persons, or for any other reason to obtain profit.
15. The accounts of the school should be audited and duly certified by the chartered accountant, and statements should be prepared. Copies of all the statements should be sent to the District Education Officer.

Nandkumar Shantaram Vaidya, Translator hereby certifies that the above written text is an accurate translation in English of the original document in Marathi, I am competent in both Marathi and ENGLISH languages to render such translations.

NSVaidya

Translator

Translator N. S. Vaidya Pune

16. Your school has been allotted U-DISE No. 27250511901. This should be mentioned whenever making correspondence with this office, which please note.
17. Information/reports as sought by the Director of Education/District Education Officer from time to time should be complied with by the school. To keep the approval of the school continuously or to eliminate deficiencies in the working of the school, instructions given by the government or local authorities should be followed.
18. Renewal of registration of the Society, if any, should be ensured.
19. Other terms and conditions are enclosed as per Annexure 3.
20. This certificate has been issued online on the basis of information filled in by you on the website https://emanyatapune.org. In case any discrepancy is observed in this regard, this certificate may be treated as cancelled.

XXX sd/- (Sanjay Naikade)
Education Officer (Primary)
Pune Zilla Parishad, Pune

Nandkumar Shantaram Vaidya, Translator hereby certifies that the above written text is an accurate translation in English of the original document in Marathi, I am competent in both Marathi and ENGLISH languages to render such translations.

Translator

Translator N. S. Vaidya Pune

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

कार्यालयीन नोंद वहीतील अ. क्र.: 59

# स्वमान्यता प्रमाणपत्र नमुना- 2

ई मान्यता ऑनलाईन अर्ज क्र. 2025816523133

दिनांक - 31/07/2025
07/08/2025

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/ मुख्याध्यापक,
**Eminence Education Society** संचलित **Eminence International School** , Bakori, Tal. Haveli, Dist. Pune

विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम , 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम , 2011 याचा नियम 11, पोट नियम (4) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

संदर्भ :- **Asma Begam Momin , Inspection Officer** यांचा ऑनलाईन आर. टी. ई. निकष तपासणी अहवाल दिनांक **22/07/2025**

आपल्या दिनांक 11/06/2025 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार शाळेची केलेली तपासणी याआधारे मी शिक्षणाधिकारी( प्राथमिक) पुणे जिल्हा परिषद पुणे दिनांक **1 April 2025 To 31 March 2028 पर्यंत ३ वर्षांच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ते 8 Eminence Education Society संचलित Eminence International School , Bakori, Tal. Haveli, Dist. Pune UDISE क्रमांक 27250511901 ( स्वयं अर्थसहाय्यित English माध्यम CBSE ) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.**

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था / शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल कारणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र द्रेणेत येईल.
   (पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की , अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/ तिची कर्तव्ये शिक्षक पार पडतील, आणि
(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये याची सुनिश्चिती शाळा करील.

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील
9. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-
    शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ: **3809.025 चौ.मी**
    एकूण बांधकाम क्षेत्र: **2229.673 चौ.मी**
    खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ: **1393.546 चौ.मी**
    वर्ग खोल्यांची संख्या :- **14 वर्ग खोल्या**
    कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली :- **3 वर्ग खोल्या**
    * मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल :-

| | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास - | **9** | **9** |
| मुताऱ्या - | **14** | **9** |

    पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे : **yes**
    दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर : no
    * अध्यापन अध्ययन साहित्य खेळ व क्रीडाविषयक सामग्री ग्रंथालय यांची उपलब्धता : yes
    * वाचन साहित्य विनासायास उपलब्ध : **(ग्रंथालय पुस्तक संख्या 325**, नियतकालिका / वर्तमानपत्र संख्या **Times of India, Sakal**)
11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरीक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेला संकेतांक **UDISE No. 27250511901** असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
17. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही प्रलंबित बाब असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.
19. जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत
20. सदर प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने https://emanyatapune.org/ या संकेतस्थळावर आपण भरलेल्या माहितीच्या आधारे निर्गमित करण्यात आलेले आहे. सबब यात विसंगती दिसून आल्यास हे प्रमाणपत्र रद्द समजण्यात यावे.

संजय नाईकडे
**शिक्षणाधिकारी प्राथमिक**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**